■ अहिल्यानगर ■ रविवार, दि. ६ सप्टेंबर २०२६ ■ वर्ष ७ वे ■ अंक ७६ वा ■ पाने ४ ■ किंमत ३ रुपये ■ RNI No. MAHMAR / 2012 / 47715 9420802145

॥ श्री ॥

आपली भूमी.. आपला आवाज...

# वीरभूमी

संपादक : महादेव दळे

www.veerbhuminews.com

**✻ सुविचार ✻**

विश्वास हा खोडरबरसारखा असतो, तुम्ही केलेल्या प्रत्येक चुकीबरोबर तो कमी होत जातो.



# महायुतीत अंतर्गत तणाव?

**● मुंबई । वीरभूमी –** मराठी भाषेच्या अनिवार्यतेवरून सत्ताधारी महायुतीतच मतभेद पाहायला मिळाले. भाजपा आणि राष्ट्रवादी काँग्रेस या नियमाच्या बाजूने नव्हते. शिवसेनेचे नेते संजय निरुपम यांनीही या प्रकरणात मवाळ भूमिका घेण्याची विनंती केली होती. काही चालकांनी याविरोधात मुंबई उच्च न्यायालयात धाव घेतली.



महायुती सरकारमधील शिवसेनेचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी ऑटोरिक्षा आणि टॅक्सी चालकांसाठी मराठी भाषा शिकणे बंधनकारक केले होते. या नियमानुसार, जो चालक मराठी शिकणार नाही, त्याचे परमिट रद्द केले जाणार होते. मात्र, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हे लक्षात आले की या नियमामुळे उत्तर भारतीयांमध्ये तीव्र नाराजी पसरत आहे. त्यानंतर त्यांनी सरनाईक यांचा हा निर्णय फिरवला आणि चालकांना मराठी शिकण्यासाठी थेट एका वर्षाची मुदत वाढवून दिली.

परिवहन विभागाने मुंबईतील बिगर मराठी ऑटोरिक्षा आणि टॅक्सी चालकांना १५ ऑगस्टपर्यंत बोलचाल करण्याइतपत मराठी शिकण्याची मुदत दिली होती. चालकांसाठी स्वयंसेवी संस्थांच्या माध्यमातून वर्गांचे आयोजनही करण्यात आले होते. १८ ऑगस्टपासून परिवहन विभागाच्या अधिकाऱ्यांनी मराठी न बोलू शकणाऱ्या चालकांवर कारवाई करण्यास सुरुवात केली. जे चालक मराठी बोलू शकले नाहीत, त्यांना एका महिन्यात मराठी शिका, अन्यथा परमिट रद्द केले जाईल अशी ताकीद देणारी नोटीस देण्यात आली.

दुसरीकडे, शिवसेना मात्र या नियमाच्या अंमलबजावणीवर ठाम होती. काही उपनगरांमध्ये चालकांनी या नियमाच्या निषेधार्थ वाहने न चालवण्याचा निर्णय घेतला, तेव्हा महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या (मनसे) कार्यकर्त्यांशी त्यांचा वाद झाला. त्यामुळे हा संपूर्ण मुद्दा पुन्हा एकदा 'उत्तर भारतीय विरुद्ध मराठी' असा रंगू लागला.

मुंबईत मोठ्या संख्येने उत्तर प्रदेश आणि बिहारमधील नागरिक राहतात आणि त्यातील अनेक जण आपल्या मूळ राज्यातील मतदारही आहेत. मराठी अनिवार्य करण्याचा निर्णय एकनाथ शिंदे यांच्या पक्षातील मंत्र्याचा असला, तरी मुख्यमंत्री म्हणून देवेंद्र फडणवीस हेच सरकारचा मुख्य चेहरा आहेत. या काळात समाजवादी पक्षाचे अध्यक्ष अखिलेश यादव यांनी भाजपकडून चालकांवर अन्याय होत असल्याचा आरोप केला. जर भाजपला भाषिक राजकारण करायचे असेल, तर त्यांनी बिगरमराठी मते मागणार नाही असे जाहीर करावे, असे आव्हान त्यांनी दिले.

विरोधी पक्ष या मुद्याचा वापर उत्तर प्रदेशच्या निवडणुकीत आपल्याविरोधात करू शकतात, अशी भीती भाजपा नेतृत्वाला वाटली. याच कारणामुळे देवेंद्र फडणवीस यांनी तातडीने हस्तक्षेप करत हा निर्णय मागे घेतला.

हा निर्णय मागे घेतल्यानंतर उत्तर भारतीयांची नाराजी दूर झाली असे भाजपला वाटत असले, तरी यामुळे राजकारणात एक नवीन वळण आले आहे. या निर्णयामुळे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची मोठी अडचण झाली आहे, कारण हा निर्णय त्यांच्याच पक्षाच्या मंत्र्याने घेतला होता. यापूर्वीही शिंदे यांनी घेतलेले काही निर्णय फडणवीस यांनी बदलल्यामुळे शिंदे नाराज असल्याच्या चर्चा महाराष्ट्राच्या राजकीय वर्तुळात रंगल्या आहेत.

## मुंबईत तब्बल १०६ गोविंदा जखमी

**● मुंबई । वीरभूमी –** ढाक्कू माक्कूम, ढाक्कू माक्कूम....बोल बजरंग बली की जय., गोविंदा रे गोपाळा या गाण्यावर थिरकत थरांवर थर रचत शनिवारी मुंबईतील विविध ठिकाणी आयोजित करण्यात आलेल्या दहीहंडी फोडण्याचा प्रयत्न विविध गोविंदा मंडळांनी केला. मात्र, हंडी फोडण्यासाठी थरांवर थर रचताना काहींचे मनोरे कोसळून त्यातील गोविंदा जखमीही झाले आहे. सायंकाळी सहा वाजेपर्यंत प्राप्त झालेल्या माहितीनुसार मुंबई महापालिका आणि शासकीय रुग्णालयंमध्ये तब्बल १६८ जखमी गोविंदा दाखल झाले होते. यातील २९ जखमींना रुग्णालयात दाखल करण्यात आले तर उर्वरीतांपैकी ८१ जवानांवर उपचार सुरु होते आणि ५८ गोविंदांवर उपचार करून सोडून देण्यात आले होते.

मुंबई महानगरीची एक महत्त्वाची सांस्कृतिक ओळख असणाऱ्या दहीहंडीच्या कार्यक्रमात गोविंदा जखमी होण्याचे प्रकार घडू शकतात, ही संभाव्यता लक्षात घेऊन महानगरपालिकेच्या शीव येथील लोकमान्य टिळक सर्वोपचार रुग्णालय, परळ येथील राजे एडवर्ड स्मारक (के. ई. एम.) रुग्णालय आणि मुंबई सेंट्रल येथील नायर रुग्णालय आणि विशेष उपचार सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

तसेच १६ उपनगरीय रूग्णालयातही १०५ रूग्णशय्या सज्ज ठेवण्यात आले आहेत. या रुग्णालयांमध्ये प्रत्येकी ५ ते १० खाटांची व्यवस्था सज्ज ठेवण्यात आली होती.

**वीरभूमी फोडणी**

अरुण महादेव वाळुंज । अहिल्यानगर, मो. ९६२३८६८३७२

**समुद्र किनारा**

निळाशार समुद्र
सुंदर सागरी किनारा
दोघांनाही जोडतो
भिडणारा वारा

भरतीला समुद्र
किनाऱ्याला विसावतो
ओहोटीला किनारा
सागरात सामावतो

## SPOT NEWS

### दहीहंडीचा सांगाडा डोक्यात पडून महिलेचा मृत्यू

**● पुणे –** पुण्यातील जुन्या सांगवी परिसरात दहीहंडीचा उत्सव संपल्यानंतर लोखंडी सांगाडा काढताना भीषण अपघात झाला. या दुर्घटनेत लोखंडी स्ट्रक्चरचा अवजड भाग डोक्यावर पडल्याने ४५ वर्षीय सलमा सलाउद्दीन पठाण यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. मिळालेल्या माहितीनुसार, दहीहंडीचा कार्यक्रम संपल्यानंतर रात्री सुमारे ११ वाजता मंडळाचे कार्यकर्ते लोखंडी सांगाडा खाली उतरवत होते. त्यावेळी स्ट्रक्चरचा एक अवजड भाग अचानक खाली पडला आणि सलमा पठाण यांच्या डोक्यावर आदळला. गंभीर दुखापत झाल्याने त्यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला.विशेष म्हणजे, सलमा पठाण यांचा मुलगा याच दहीहंडी मंडळात सक्रिय कार्यकर्ता आहे. मुलाचा मंडळाशी संबंध असल्याने कुटुंबीयांनी पोलिसांत तक्रार देण्यास नकार दिल्याची माहिती आहे.

### रामकुंडात स्नानासाठी उतरलेली पाच मुले बुडाली

**● नाशिक –** नाशिकमधील रामकुंडात स्नानासाठी उतरलेल्या मुलांपैकी पाच जण बुडाले. स्थानिक नागरिक आणि जीवरक्षक दलाने तातडीने बचाव कार्य हाती घेतल्याने चार मुलांना वाचवण्यात यश आले, तर एका मुलाचा बुडून मृत्यू झाला. मुंबईत राहणाऱ्या ४० जणांचा ग्रुप धार्मिक पर्यटनासाठी नाशिकमध्ये आले होते. सकाळी गोदावरी नदीत स्नान करून शिर्डीला साईबाबांच्या दर्शनासाठी जाण्याचा त्यांचा नियोजित कार्यक्रम होता. सकाळी सगळे गोदावरीतील रामकुंडात स्नानासाठी उतरले. त्यांच्यासोबतची मुलेही पाण्यात उतरली. यात पाच मुले बुडाली.

## शिवभोजन केंद्रांना तीन महिन्यांचे १.२५ कोटींचे अनुदान मंजूर

**● अहिल्यानगर । वीरभूमी –** गरिब व गरजू नागरिकांना अवघ्या १० रुपयांत पोटभर जेवण उपलब्ध करून देणाऱ्या शिवभोजन थाळी योजनेतील केंद्रचालकांना मोठा दिलासा मिळाला आहे. राज्य शासनाने अहिल्यानगर जिल्ह्यातील ३८ शिवभोजन केंद्रांसाठी मार्च, एप्रिल व मे या तीन महिन्यांचे तब्बल १ कोटी २५ लाख २६ हजार रुपयांचे अनुदान मंजूर केले आहे.




जिल्ह्यातील ३८ केंद्रांमधून दररोज सुमारे तीन हजार नागरिकांना शिवभोजनाचा लाभ मिळतो. मात्र, मार्च महिन्यापासून अनुदान रखडल्याने केंद्रचालक आर्थिक अडचणीत सापडले होते. अन्नधान्य, भाजीपाला, तेल, मसाले, इतर साहित्य तसेच कर्मचाऱ्यांचे वेतन यांचा खर्च भागवताना त्यांना पदरमोड करावी लागत होती.

तीन महिन्यांचे अनुदान मंजूर झाल्याने केंद्रचालकांना काहीसा आर्थिक दिलासा मिळणार असून, गरिबांसाठीची १० रुपयांची शिवभोजन थाळी सुरळीतपणे सुरू ठेवण्यास मदत होणार आहे. मात्र, जून, जुलै व ऑगस्ट या पुढील तीन महिन्यांचे अनुदान अद्याप मंजूर झालेले नाही. त्यामुळे उर्वरित अनुदानही लवकर मंजूर करावे, अशी अपेक्षा केंद्रचालकांकडून व्यक्त होत आहे.

## कल्याण ते लातूर आता अवघ्या ४ तासांत; ३५ हजार कोटींच्या एमएच- ६१ ला समांतर ग्रीनफिल्ड एक्सप्रेसवेला मंजुरी

**● मुंबई । वीरभूमी –** मुंबई महानगर प्रदेश आणि मराठवाड्याला थेट जोडणाऱ्या कल्याण-लातूर जनकल्याण एक्सप्रेसवेला राज्य सरकारने मंजुरी दिली आहे. सुमारे ४४२ किलोमीटर लांबीचा आणि सहा पदरी असलेला हा ग्रीनफिल्ड, पूर्णपणे क्सेस-कंट्रोल्ड एक्सप्रेसवे तयार झाल्यानंतर कल्याण ते लातूरचा प्रवास सध्याच्या १० ते ११ तासांवरून अवघ्या ४ तासांवर येण्याची अपेक्षा आहे.

या प्रकल्पासाठी सुमारे ३५ हजार कोटी रुपये खर्च अपेक्षित असून, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडून या महामार्गाचे काम केले जाणार आहे. या महामार्गामुळे ठाणे, कल्याण, अहिल्यानगर, बीड, धाराशिव आणि लातूर हे भाग वेगाने जोडले जाणार आहेत.

या एक्सप्रेसवेचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे माळशेज घाटात तब्बल ८ किलोमीटर लांबीचा बोगदा उभारला जाणार आहे. त्यामुळे घाटातील वळणावळणाचा रस्ता, वाहतूक कोंडी आणि प्रवासातील अडचणी कमी होण्याची अपेक्षा आहे. कल्याण-लातूर एक्सप्रेसवे दिल्ली-मुंबई एक्सप्रेसवेच्या विरार-JNPT लिंक तसेच रिंग रोड नेटवर्कशी जोडला जाणार आहे. यामुळे मराठवाड्यातून मुंबई आणि गच्छढ बंदरापर्यंत मालवाहतूक अधिक सुलभ होण्याची शक्यता आहे. तसेच हा मार्ग विरार-अलिबाग मल्टीमॉडल कॉरिडॉरलाही जोडला जाणार आहे. लातूरच्या दिशेला या एक्सप्रेसवेचा इंटरचेंज नागपूर-गोवा शक्तिपीठ एक्सप्रेसवेशी होणार आहे.

हा नवीन ग्रीनफील्ड एक्सप्रेसवे सध्याच्या एमएच-६१ (कल्याण-अहमदनगर-नांदेड हायवे) ला समांतर असणारा हायस्पीड कॉरिडॉर ठरेल. हा महामार्ग कल्याण, मुरबाड, माळशेज घाट ओतूर (आळेफाटा), अहिल्यानगर, पाथर्डी, बीड, मांजरसुंबा, अंबाजोगाई मार्गे लातूरला पोहोचेल. भविष्यात या महामार्गाचा विस्तार महाराष्ट्र-कर्नाटक सीमेवरील बिदर आणि गुलबर्गा मार्गापर्यंत करण्याचा प्रस्ताव आहे.

# जुन्या पेन्शनसाठी शिक्षक दिनी शिक्षकांचे काळ्या फिती लावून धरणे आंदोलन

**अहिल्यानगर जिल्हाधिकारी कार्यालय परिसर घोषणांनी दणाणला । २८ सप्टेंबरपासून मुंबईत बेमुदत आंदोलनाचा इशारा**

**● अहिल्यानगर । वीरभूमी –** जुन्या पेन्शन योजनेपासून वंचित ठेवण्यात आल्याच्या निषेधार्थ राज्यातील माध्यमिक शाळांमधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी शिक्षक दिनी, शनिवारी (दि. ५ सप्टेंबर) अहिल्यानगर जिल्हाधिकारी कार्यालयासमोर काळ्या फिती लावून धरणे आंदोलन केले. जुन्या पेन्शन योजनेच्या मागणीसाठी आंदोलक शिक्षकांनी जोरदार घोषणाबाजी करीत शासनाच्या धोरणाचा निषेध केला. आंदोलकांच्या घोषणांनी जिल्हाधिकारी कार्यालयाचा परिसर दणाणून गेला.

जुनी पेन्शन कोअर कमिटीचे राज्य सचिव तथा जुन्या पेन्शन योजना समन्वय संघाचे राज्य समन्वयक महेंद्र हिंगे, राज्य समन्वयक सुनील भोर यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन करण्यात आले. यावेळी सुनील पंडित, आप्पासाहेब शिंदे, बाबासाहेब बोडखे, रमजान हवालदार, आप्पासाहेब जगताप, सचिन झगडे, भाऊसाहेब कचरे, देविदास खेडकर, संजय इघे, सुनील दानवे, संजय वाळे, राज गवांदे, संजय भुसारी, सुदाम दळवी, वैभव सांगळे, जाकीर सय्यद, कैलास राहणे, मिथुन डोंगरे आदींसह जिल्ह्यातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी झाले.

दि. १ नोव्हेंबर २००५ पूर्वी नियुक्त झालेल्या विनाअनुदानित अथवा अंशतः अनुदानित कायम आस्थापनेवरील नियमित वेतनश्रेणीतील तसेच त्यानंतर १०० टक्के अनुदान प्राप्त प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा आणि तुकड्यांवरील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना १९८२ ची जुनी सेवानिवृत्ती वेतन योजना लागू करावी, अशी मागणी आंदोलकांनी केली आहे.

राज्यातील सुमारे २६ हजार पेन्शनपीडित शिक्षक-कर्मचाऱ्यांना १९८२ ची जुनी पेन्शन योजना लागू करण्याचा प्रश्न अनेक वर्षांपासून प्रलंबित असल्याचे संघटनेचे म्हणणे आहे. या मागणीसाठी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी यापूर्वी विविध आंदोलने, निवेदने, मोर्चे आणि इतर लोकशाही मार्गांचा अवलंब करून शासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला. मात्र, वारंवार आंदोलने करूनही या प्रश्नावर शासनाकडून अद्याप ठोस निर्णय घेण्यात आलेला नसल्याचा आरोप जुन्या पेन्शन योजना समन्वय संघाने केला आहे.

शिक्षकांचा सन्मान करण्याचा दिवस म्हणून शिक्षक दिन साजरा केला जात असतानाच शिक्षकांनाच आपल्या न्याय्य हक्कासाठी आंदोलन करावे लागत असल्याची खंत आंदोलकांनी व्यक्त केली. शिक्षणाच्या माध्यमातून समाज आणि भावी पिढी घडविणाऱ्या शिक्षकांच्या भविष्याशी संबंधित पेन्शनचा प्रश्न शासनाने गांभीर्याने सोडवावा, अशी मागणी यावेळी करण्यात आली. आंदोलनाच्या पहिल्या टप्प्यात दि. १ ते ४ सप्टेंबरदरम्यान शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी शाळांमध्ये काळ्या फिती बांधून नियमित शैक्षणिक कामकाज केले. काळ्या फितींच्या माध्यमातून शासनाच्या धोरणाचा निषेध नोंदवित प्रलंबित जुन्या पेन्शनच्या प्रश्नाकडे शासनाचे लक्ष वेधण्यात आले.



शनिवारी जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे तसेच संबंधित शिक्षण विभागाला निवेदन पाठविण्यात आले. राज्यातील सुमारे २६ हजार पेन्शनपीडित बांधवांना न्याय व हक्काची १९८२ ची जुनी सेवानिवृत्ती वेतन योजना लागू करण्याबाबत दि. २५ सप्टेंबर २०२६ पूर्वी सुस्पष्ट शासन आदेश निर्गमित करावा, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.

शासनाने २५ सप्टेंबरपर्यंत १९८२ ची जुनी पेन्शन योजना लागू करण्यासंदर्भात स्पष्ट शासन आदेश निर्गमित न केल्यास आंदोलन अधिक तीव्र करण्याचा निर्णय संघटनेने जाहीर केला आहे. शासनाकडून सकारात्मक निर्णय न झाल्यास दि. २८ सप्टेंबर २०२६ पासून मुंबईतील आझाद मैदानावर बेमुदत धरणे आंदोलन सुरू करण्यात येणार असल्याचा इशारा देण्यात आला आहे. त्यानंतर दि. २ ऑक्टोबर २०२६, महात्मा गांधी जयंतीपासून आमरण उपोषण करण्याचा निर्धारही संघटनेने व्यक्त केला आहे.

याशिवाय आगामी विधानपरिषद निवडणुकीमध्ये शिक्षक, कर्मचारी, पदवीधर, विद्यार्थी व पालकांच्या माध्यमातून लोकशाही मार्गाने मतदानावर बहिष्कार घालण्याचा इशाराही संघटनेने दिला आहे. निवेदनात आंदोलनकर्त्यांनी १९८२ च्या जुन्या सेवानिवृत्ती वेतन योजनेचे आपण न्यायिक व हक्कदार असूनही शासनाकडून न्याय मिळत नसल्यास राज्यातील सुमारे २६ हजार पेन्शनपीडित बांधवांना इच्छामरणाची परवानगी द्यावी, अशी मागणी केली आहे.

# SPOT NEWS

## पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत हरदिन मॉर्निंग ग्रुपचा शिक्षक दिन उत्साहात

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**

शिक्षक दिनाचे औचित्य साधून हरदिन मॉर्निंग ग्रुपच्या वतीने भिंगार येथील भगवान गौतम बुद्ध जॉगिंग पार्कमध्ये पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत शिक्षक दिन साजरा करण्यात आला. आजी-माजी शिक्षकांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले, तसेच ग्रुपचे सदस्य, शिक्षक व नागरिकांनी उद्यान परिसरात स्वच्छता अभियान राबविले. कार्यक्रमाच्या प्रारंभी डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन व महात्मा ज्योतिराव फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. उज्वला कळमकर, सुरेखाताई आमले, मीराबाई आल्हाट, राजेंद्र भोसले, विलास तोडमल, चांदेकर सर, नवनाथ आमले व श्यामसुंदर खेले यांच्या हस्ते वृक्षारोपण झाले. यावेळी संस्थापक अध्यक्ष संजय सपकाळ यांनी, शिक्षकांच्या माध्यमातून पर्यावरण संवर्धनाची चळवळ घराघरांत आणि समाजाच्या प्रत्येक घटकापर्यंत पोहोचू शकते, असे सांगितले. विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण, स्वच्छता आणि सामाजिक बांधिलकीची जाणीव निर्माण करण्याचे आवाहन त्यांनी केले. सचिन चोपडा यांनी वृक्षारोपणाबरोबरच लावलेल्या झाडांचे संगोपन करण्याची गरज व्यक्त केली. कार्यक्रमास दिलीप ठोकळ, डॉ. सुचिता मांजरे, साधनाताई पोखरणा, आरती बोराडे, प्रांजली सपकाळ, मनिषा गायकवाड, पौर्णिमा खेले, निकिता वैद्य यांच्यासह हरदिन मॉर्निंग ग्रुपचे सदस्य, आजी-माजी शिक्षक व नागरिक उपस्थित होते. दिलीप ठोकळ, सुरेखा आमले, सुभाष होडगे, संजय शिंदे, किसन मेहेर व राजेंद्र कळमकर यांनी मनोगत व्यक्त केले.

## निमगाव वाघाच्या ग्रामसभेत पै. नाना डोंगरे यांचा सत्कार

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**

नगर तालुका तालीम सेवा संघाच्या अध्यक्षपदी पै. नाना डोंगरे यांची फेरनिवड झाल्याबद्दल निमगाव वाघा (ता. नगर) ग्रामपंचायतीच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. नुकत्याच झालेल्या ग्रामसभेत त्यांच्या फेरनिवडीबद्दल अभिनंदनाचा ठराव करण्यात आला. उपसरपंच किरण जाधव, ग्रामविकास अधिकारी प्रविण पानसंबळ व केंद्रप्रमुख अतुल काकडे यांच्या हस्ते पै. डोंगरे यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी अनिल डोंगरे, सागर कापसे, अतुल फलके, वसंत फलके, गणेश येणारे, राजू जाधव आदी उपस्थित होते. साहेबराव बोडखे मित्र मंडळाच्या वतीनेही भागचंद जाधव यांच्या हस्ते डोंगरे यांचा सत्कार करण्यात आला. कुस्ती क्षेत्राला प्रोत्साहन देण्यासाठी नगर तालुका तालीम सेवा संघाच्या माध्यमातून विविध कुस्ती स्पर्धांचे आयोजन, निवड चाचण्या तसेच गुणवंत मल्लांना पुढील स्पर्धांसाठी सहकार्य केले जाते. ग्रामीण भागातील होतकरू मल्लांना योग्य व्यासपीठ व मार्गदर्शन मिळावे, यासाठी संघाच्या माध्यमातून प्रयत्न सुरू असल्याचे पै. नाना डोंगरे यांनी सांगितले. उपसरपंच किरण जाधव म्हणाले की, तालीम संस्कृतीची परंपरा जपत नव्या मल्लांना घडविण्याचे काम पै. नाना डोंगरे यांच्याकडून कौतुकास्पद पद्धतीने सुरू आहे. ग्रामीण भागातील गुणवंत मल्लांना संधी मिळवून देण्याचे त्यांचे कार्य उल्लेखनीय असल्याचे त्यांनी सांगितले.

# श्रीकृष्णांनी गीतेत कर्मयोगाचा दिव्य संदेश दिला

### महंत माधवबाबा | शंकर महाराज मठात जन्माष्टमी उत्साहात

**● पाथर्डी । वीरभूमी –**

भगवान श्रीकृष्णांनी भगवद्गीतेच्या माध्यमातून मानवजातीला कर्मयोग आणि सन्मार्गाचा दिव्य संदेश दिला. जीवनात धर्म, नीतिमत्ता आणि सद्गुण अंगीकारल्यावरच खरी शांती मिळते. कुरुक्षेत्रावर अर्जुनाला उपदेश करताना श्रीकृष्णांनी जगाच्या कल्याणासाठी गीतेचा संदेश दिला, असे प्रतिपादन श्री शंकर महाराज मठाचे संस्थापक व महंत माधवबाबा यांनी केले.

श्री शंकर महाराज मठात श्रीकृष्ण जन्माष्टमी सोहळा भक्तिभाव व उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी आयोजित कार्यक्रमात महंत माधवबाबांनी उपस्थित भाविकांना मार्गदर्शन केले.



माधवबाबा म्हणाले, आधुनिक युगातही तरुणांनी भगवान श्रीकृष्णांची शिकवण व विचार आत्मसात करून सन्मार्गाने जीवन जगणे आवश्यक आहे. श्रीकृष्णांचा जनकल्याण व भक्तीचा मार्ग सद्गुरू शंकरबाबांनी आपल्या कार्यातून पुढे नेला. त्यांनी दीनदुबळ्यांची सेवा आणि ईश्वरभक्तीची शिकवण दिली. त्यांच्या दैवी प्रेरणेने मठाच्या माध्यमातून सामाजिक व आध्यात्मिक कार्य तसेच अष्टमी निमित्त भोजन महाप्रसादाचा उपक्रम सुरू आहे. भाविकांनी सद्गुरू शंकरबाबांचा आदर्श समोर ठेवून जीवन समृद्ध करावे, असे आवाहन त्यांनी केले.

जन्माष्टमीनिमित्त मठात विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. विधिवत पूजा व श्रीकृष्णाच्या मूर्तीचा अभिषेक करण्यात आला. मध्यरात्री १२ वाजता श्रीकृष्ण जन्मोत्सव उत्साहात साजरा झाल्यानंतर महाआरती करण्यात आली. त्यानंतर मठाच्या वतीने सुंठवडा व महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.

या सोहळ्यासाठी रवीशेठ पाथरकर, रामनाथ बंग, बबन सोनटक्के, शंकर पाथरकर, माजी नगरसेविका सुरेखा गोरे तसेच शंकरबाबा महिला भक्त मंडळासह पाथर्डी शहर व परिसरातील भाविकांनी मोठी गर्दी केली होती. उत्सवाच्या यशस्वितेसाठी मठातील स्वयंसेवक व भाविकांनी विशेष परिश्रम घेतले.

## विद्यार्थ्यांनी पर्यावरणपूरक गणेशमूर्ती साकारत दिला पर्यावरण संवर्धनाचा संदेश

### शाडूच्या मातीपासून ५७८ विद्यार्थ्यांनी घडविल्या सुबक मूर्ती



**● शेवगाव । वीरभूमी–**

वाढत्या प्रदूषणामुळे निसर्ग संवर्धन करणे मोठे आव्हान बनले आहे. गणेशोत्सव पर्यावरणपूरक पद्धतीने साजरा व्हावा, या उद्देशाने विद्यार्थ्यांनी स्वतः गणेशमूर्ती तयार करण्याची कार्यशाळा आयोजित करण्यात आली. स्वतः घडविलेल्या गणेशमूर्तींची प्रतिष्ठापना करण्याचा आनंदही विद्यार्थ्यांना वेगळाच अनुभव देणारा ठरेल, असे प्रतिपादन प्राचार्य बालाजी गायकवाड यांनी केले.

रेसिडेन्शिअल हायस्कूल अँड ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्स, शेवगाव येथे विद्यालयातील हरित सेना विभागांतर्गत सचिन दहिफळे यांच्या आयोजनातून पर्यावरणपूरक गणपती कार्यशाळा घेण्यात आली.

कलाशिक्षक शंभुराजे पोपळघट, शिवाजी उदागे व पोपट घाडगे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यालयातील ५७८ विद्यार्थ्यांनी शाडूच्या मातीपासून सुंदर व सुबक गणेशमूर्ती साकारल्या.

यावेळी प्राचार्य बालाजी गायकवाड, उपमुख्याध्यापक अविनाश रामफळे, पर्यवेक्षक महेश शिंदे आदी उपस्थित होते.

## नवागत विद्यार्थी शिक्षकांनी घेतला अध्यापनाचा अनुभव; शिक्षकांच्या योगदानाचा गौरव

### चापडगाव विद्यालयात शिक्षक दिन उत्साहात साजरा

**● शेवगाव । वीरभूमी–**

ये बाळा, शांत बस... बडबड करू नका... नीट वाचा... लक्ष द्या... सांग, या प्रश्नाचे उत्तर काय? अशा सूचना देत नवागत शिक्षकांनी विद्यार्थ्यांचे वर्ग घेत अध्यापनाचा प्रत्यक्ष अनुभव घेतला. चापडगाव माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात शिक्षक दिन उत्साहात साजरा करण्यात आला.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे प्राचार्य संपत दसपुते होते. यावेळी उपप्राचार्य सुनील जायभाये, पर्यवेक्षक संजय दुधाडे, नवागत प्राचार्य साक्षी लोहकरे, शिवम नागरगोजे, उपमुख्याध्यापिका श्रद्धा मडके, कृतिका नवले, पर्यवेक्षक विश्वास दहिफळे, संस्कृती लोहकरे आदी उपस्थित होते.

अध्यक्षीय भाषणात प्राचार्य संपत दसपुते म्हणाले, डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा जन्म सामान्य कुटुंबात झाला. प्रतिकूल परिस्थितीतही त्यांनी उच्च शिक्षण घेऊन शिक्षक म्हणून ज्ञानदानाचे पवित्र कार्य केले. शिक्षकी पेशा ही नोकरी नसून एक व्रत आहे. समाजाला योग्य दिशा देणारा मार्गदर्शक म्हणून शिक्षकाची भूमिका महत्त्वाची आहे.

शिक्षक प्रतिनिधी भारत म्हस्के म्हणाले, अविरत ज्ञानदान करणारी व्यक्ती म्हणजे शिक्षक होय. शिस्तप्रियता, क्षमाशीलता आणि कर्तव्यदक्षता हे शिक्षकांचे गुण आहेत. आई-वडिलांनंतर गुरुस्थानी असलेल्या शिक्षकाचे स्थान समाजात महत्त्वाचे आहे.

नवागत विद्यार्थी-शिक्षक साक्षी लोहकरे, दिव्यानी जगधने, श्रुती गर्जे, कृतिका नवले, संस्कृती लोहकरे व शिवम नागरगोजे यांनी शिक्षक दिनानिमित्त आपले अनुभव व्यक्त केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रद्धा गावंढे यांनी केले. प्रास्ताविक समृद्धी काळे यांनी, तर अनुमोदन स्नेहा केदार यांनी केले. आरती काळे यांनी आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी नवागत शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.

# सदाचारी व्यक्तिमत्व गुलाबराव नवले (भाऊ)



**नवलेवाडी गावातील एक सर्वसामान्य शेतकरी कुटुंबात दिनांक १ जून १९५४ रोजी गुलाबराव दामोदर नवले अर्थात भाऊ यांचा जन्म झाला.**

शकुंतला बाईंच्या बरोबर संसार करत असताना सुजित, सुजाता आणि सचिन या आपल्या तीनही मुलांना शिकवून ऑफसेट व प्रिंटिंगच्या व्यवसायात राजुर येथून सुरुवात केली. सुजाता ताईचे लग्न झाले व मध्येच तिच्या अपघाती निधनाने कुटुंबावर मोठा दुःखाचा डोंगर कोसळला. भाऊ आणि बाई यांनी आपल्या काळजावर दगड ठेवून मुलांनी सुरू केलेला सुजाता ऑफसेट व प्रिंटिंग प्रेस नावाचा व्यवसाय मोठा करण्यात कठोर परिश्रम घेतले. दरम्यानच्या काळात दोघेही सुजाताताईच्या जाण्याचे दुःख विसरून आपल्या नातवंडांमध्ये रमले होते. आपले नित्याचे काम करत गावातील मंदिरात हरिपाठ करणे हा भाऊंचा व्यासंगच होता. नवलेवाडी हे गाव कम्युनिस्टवादी चळवळीचे असल्याने गावात पूर्वी मंदिर कोठे होते हेच कळत नव्हते, परंतु मधुभाऊंच्या नेतृत्वाखाली व भाऊंच्या सहकार्यांनी एकत्र येऊन नवलेवाडी गावात भव्य विठ्ठल रुक्मिणी मंदिराची स्थापना केली. अकोले तालुक्यातील सर्व लिफ्ट शेतीसाठीच्या जुन्या पाणीपुरवठा योजना बंद झाल्या परंतु ३० ते ४० वर्ष प्रवरा नदीवरील लिफ्ट भाऊंच्या अचूक नियंत्रणाखाली सुरु होती. यावरून भाऊंना सामाजिक व धार्मिक कार्यातही आवड होती,ही गोष्ट अधोरेखित होते.

श्रद्धा, सुयश, सोहम या नातवंडांना शाळेत व ट्युशनला सोडणे, त्यांना सायकल, टू व्हीलर शिकवणे अशी छोटी छोटी कामे भाऊ नातवंडांना खेळीमेळीच्या वातावरणात शिकवत असताना मी पाहिली. सौ. स्वातीताई व सौ. सविता या दोन्हीही सुनांनी लडिवाळपणे भाऊंना कामे सांगायची व ती भाऊंनी निसंकोचपणे करायची. आपल्या सुनांना मुलीप्रमाणे वागणूक देऊन आपलं दुःख हलकं करायचं इतकी सात्विकता भाऊंच्या व्यक्तिमत्वातून आम्हाला पाहायला मिळाली. रागवणे हा त्यांचा स्वभाव गुणच नव्हता. जितका विश्वास भाऊंचा आपल्या सुजितराव व सचिन यांनी सुरु केलेल्या व्यवसायावर होता, तितकाच अभिमान पुतण्या डॉक्टर अजितराव यांच्या आंदोलनांवर व चळवळीवर सुद्धा होता. भाऊ नेहमी अभिमानाने म्हणायचे आमच्या अजितने एखादं चळवळीचं काम हातात घेतलं की, तो त्याची बांडी पाडणारच.. इतका दुर्दम्य आत्मविश्वास आपल्या पुढील पिढीवर भाऊंचा होता. भाऊ आपण केलेले कष्ट आमच्या कधी दृष्टिक्षेपात आले नाही, परंतु आपण आपल्या कष्टातून उभे केलेले राजवैभव त्याची दरवळ आपण केलेल्या अपार कष्टाची जाणीव करून दिल्याशिवाय राहत नाही.

भाऊंनी बाईच्या मदतीने कुटुंबासाठी वेचलेला प्रत्येक क्षण कुठल्याच परिमाणात मोजता येणार नाही. आपल्या व्यक्तिमत्त्वातील कष्टाळूपणा, प्रामाणिकपणा, आपल्या अंगी असलेली निरागसता, आपल्या वागण्यातील बोलण्यातील सुसंस्कृतपणा आपल्या कुटुंबीयांच्या अंगी उतरवण्याचा तुमचा सततचा प्रयत्न आता थांबला. आता आमचीही जबाबदारी वाढली.

आपण कुटुंबासाठी रात्रंदिवस मेहनत करून उभा केलेला बुरुज आपल्या जाण्याने ढासळला. आभाळासारखे सतत सावली बनून राहिलेली पितृछत्र हरपलं याची जाणीव गेल्या दहा दिवसात रात्रंदिवस होतेय. आपला सदैव हसतमुख चेहरा, शांत, संयमी, मानवधर्म जपण्याच्या स्वभावाने कमावलेल्या आपल्या जवळच्या प्रत्येकाच्या हृदयातून हुंदका दाटून आल्याशिवाय राहत नाही. म्हणून आपल्या कृतज्ञतेप्रती या दोन ओळी

माझ्या डोळ्यातलं आसवं! कुणी मायना पुसताना!! उरी हुंदका दाटतोया! गोष्ट बापाची सांगताना!! त्याच्या फाटक्या सदऱ्याला! किती थीगळं जोडल्याली !! उभ्या आयुष्याला त्यांनी कशी कातर लावलेली! मला कससं होतया कोणी बाबा म्हणताना!! उरी हुंदका दाटतोया गोष्ट बापाची सांगताना !!..

असा दिलखुलास सहृदयी मायाळू बाप,ज्याने बाप या शब्दाची उंची वाढवताना आम्ही पाहिली. जगातील प्रत्येक लेकराला तो बाप मिळावा. तुमचा असणं आमच्यासाठी सर्व काही होतं. तुमच्या सोबत जगण्याची स्वप्ने आता विरून गेली, हळवे आमच्या हृदयाला यातना देऊन गेली. आयुष्यभर आता आम्हाला हीच उणीव राहील. तुमची आठवण आम्हाला क्षणोक्षणी येईल.

आपले आशीर्वाद मार्गदर्शन, दूरदृष्टी, उत्तम चारित्र्यसंपन्न जीवन, वारकरी पंथात कमवलेला सत्संग, कुटुंबाप्रति असलेले अतोनात प्रेम, माती आणि शेती यावर केलेली प्रचंड माया आम्हाला सतत जगण्याची ऊर्जा देत राहील.

भाऊ आपण इतके कष्टप्रद जीवन व्यतीत करून आम्हाला जाताना सेवा करण्याची एकही संधी दिली नाही, ही खंत आमच्या मनात कायम घर करून राहील. परमेश्वर आपल्याला त्याच्या पायाजवळ जागा देवो. हीच प्रार्थना..

'भाऊ' आपणास सहस्त्रनयनांनी भावपूर्ण श्रद्धांजली!

● शब्दांकन : श्री. प्रशांत धुमाळ पाटील

## संत नारायण महाराजांचे विचार अंगीकारल्यास गावाची प्रगती निश्चित

### हत्राळ-सैदापूर येथे मूर्ती प्राणप्रतिष्ठा सोहळा भक्तिमय वातावरणात

**● पाथर्डी । वीरभूमी–**

संत नारायण महाराजांचे विचार व आचार घराघरांत पोहोचवून प्रत्येकाने ते अंगीकारले, तर गावाची प्रगती निश्चित होईल. त्यांच्या कार्याची प्रेरणा समाजाला मिळण्यासाठी संतांचे विचार जनमानसात रुजणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन तारकेश्वर गडाचे महंत आदिनाथ महाराज शास्त्री यांनी केले.



हत्राळ-सैदापूर येथे ग्रामस्थांच्या वतीने वाचासिद्धी संत नारायण महाराज यांच्या मूर्तीचा प्राणप्रतिष्ठा सोहळा भक्तिमय व उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. यावेळी महंत आदिनाथ महाराज शास्त्री यांची प्रमुख उपस्थिती होती.

प्राणप्रतिष्ठा सोहळ्यानिमित्त महंत आदिनाथ महाराज शास्त्री यांची टाळ-मृदंगाच्या गजरात व पुष्पवृष्टी करत भव्य मिरवणूक काढण्यात आली. त्यानंतर त्यांच्या कीर्तनाचे आयोजन करण्यात आले. यावेळी ते म्हणाले, भगवान श्रीकृष्ण जन्मोत्सवाच्या दिवशी संत नारायण महाराज आपल्या गावात आले आहेत. त्यामुळे यापुढे गावाची भरभराट व प्रगती निश्चितच होईल.

प्रत्येक गावात संत नारायण महाराजांची मूर्ती स्थापन होऊन त्यांचे विचार जनमानसात रुजणे गरजेचे आहे. तरुणांनी व्यसनांपासून वाईट सवयींपासून दूर राहावे. संतांच्या संगतीत राहिल्यास मानवाची उन्नती होते. प्रत्येकाने इतरांविषयी आदराची भावना ठेवावी, असे आवाहनही महंत आदिनाथ महाराज यांनी केले.

कीर्तनानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले. संपूर्ण सोहळ्यात भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते. कार्यक्रमास हत्राळ-सैदापूरचे सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, ग्रामस्थ, तरुण, महिला, परिसरातील भजनी मंडळे तसेच भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

वीरभूमी हे पत्रक मालक, मुद्रक व प्रकाशक- महादेव एकनाथ दळे यांनी आदिनाथ प्रिंटिंग प्रेस, कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर, ४१४५०५ येथे मुद्रित करून तिसगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर-४१४१०६ येथे प्रसिद्ध केले. संपादक- महादेव दळे, पत्ता- कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर मो. ९४२०८०२१४५ Email - mahadevdale@gmail.com वेबसाईट : www. veerbhuminews.com

SPOT NEWS

## काका ट्रस्टच्या वतीने शिक्षक दिनी आदर्श शिक्षकांचा गुणगौरव

**अहिल्यानगर । वीरभूमी–**

शाळेच्या पलीकडे जीवनाला दिशा देत संस्कारक्षम पिढी घडविण्याचे कार्य शिक्षक करतात. आज पर्यावरणाचे गंभीर प्रश्न निर्माण झाले असून, भावी पिढीला पर्यावरण संवर्धनाचे शिक्षण देण्याची महत्त्वाची जबाबदारी शिक्षकांवर आहे, असे प्रतिपादन आमदार संग्राम जगताप यांनी केले. काका ट्रस्टच्या वतीने शिक्षक दिनानिमित्त शनिवारी (दि. ५ सप्टेंबर) सावेडी येथील प्रमोदजी महाजन स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रात आदर्श शिक्षक पुरस्कार व गुणगौरव सोहळा आयोजित करण्यात आला. गंगाधर शास्त्री गुणे आयुर्वेद महाविद्यालयाचे अध्यक्ष ड. सचिन जगताप यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कार्यक्रमात आ. जगताप बोलत होते. यावेळी डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन व स्व. आमदार अरुणकाका जगताप यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. आ. संग्राम जगताप व ॲड. सचिन जगताप यांच्या हस्ते पुरस्कारप्राप्त शिक्षकांचा फेटा, शाल व सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. प्रास्ताविकात प्रा. माणिक विधाते यांनी समाज घडविण्यात व संस्कारक्षम पिढी निर्माण करण्यात शिक्षकांचे योगदान महत्त्वाचे असल्याचे सांगितले. ॲड. सचिन जगताप यांनी पुरस्कारप्राप्त शिक्षकांचे अभिनंदन केले. कार्यक्रमास मोठ्या संख्येने शिक्षक–शिक्षिका उपस्थित होते. यावेळी भाऊसाहेब कबाडी, अरुण पवार, अक्षय सातपुते, विजय दिघे, छाया कुदांडे, मनीषा फसले, वैभव वाघ, मीनाक्षी खोडदे यांच्यासह विविध शाळा व महाविद्यालयांतील ६० हून अधिक शिक्षकांचा आदर्श शिक्षक पुरस्काराने गौरव करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अमोल शिंदे यांनी केले.

## लिटिल स्कॉलर्स स्कूलमध्ये बाळगोपाळांनी फोडली दहीहंडी

**अहिल्यानगर । वीरभूमी–**

तपोवन रोड येथील लिटिल स्कॉलर्स प्रि–प्रायमरी स्कूलमध्ये श्रीकृष्ण जन्माष्टमीनिमित्त दहीहंडी उत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. पारंपरिक वेशभूषेत सहभागी झालेल्या चिमुकल्या बाळगोपाळांनी दहीहंडी फोडत उत्सवाचा आनंद लुटला. श्रीकृष्ण, राधा व गोपाळांच्या वेशभूषेतील विद्यार्थ्यांनी उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. कार्यक्रमाला पालक तसेच तपोवन रोड व लक्ष्मी कॉलनी परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. शाळेच्या प्राचार्या संगीता जाधव यांनी विद्यार्थ्यांना दहीहंडीचे धार्मिक व सांस्कृतिक महत्त्व सांगत श्रीकृष्णाच्या बाललीला, गोपाळकाला व विविध कृष्णलीलांची माहिती दिली. सण–उत्सवांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना भारतीय संस्कृती व परंपरांची ओळख करून देण्याचा शाळेचा प्रयत्न असल्याचे त्यांनी सांगितले.

## बिजलाबाई झावरे यांचे निधन

**निघोज । वीरभूमी–**



पारनेर तालुक्यातील वासुंदे येथील श्रीमती बिजलाबाई भिमाजी झावरे (वय ८० वर्षे) यांचे नुकतेच निधन झाले.त्यांनी अत्यंत कष्टाने व जिद्दीने आपला प्रपंच फुलवला.त्या धार्मिक वृत्तीच्या होत्या. त्यांच्या मागे तीन मुले, सुना, एक मुलगी व नातवंडे असा मोठा परिवार आहे. मुंबई येथील उद्योजक आबासाहेब झावरे, पत्रकार शरद झावरे व माजी ग्रा.पं. सदस्य रविंद्र झावरे यांच्या त्या मातोश्री तर पत्रकार बबनराव गायके यांच्या ज्येष्ठ भगिनी होत.

# अकोल्यात ७८ एकल महिलांची मोफत आरोग्य तपासणी

### कॅन्सरसह विविध तपासण्या । सुमारे १२ डॉक्टरांच्या पथकाचा सहभाग

**अकोले । वीरभूमी –**



अहिल्या एकल महिला हक्क संरक्षण समिती, अकोले यांच्या माध्यमातून इंडियन कॅन्सर सोसायटी आणि एस.एम.बी.टी. दंत महाविद्यालय, संगमनेर यांच्या सहकार्याने एकल महिलांसाठी आयोजित करण्यात आलेले मोफत आरोग्य तपासणी शिबिर कौतुकास्पद आहे. एकल महिलांच्या प्रश्नांबाबत प्रशासन संवेदनशील असून अशा उपक्रमांच्या पाठीशी प्रशासन कायम राहील, असे प्रतिपादन अकोल्याचे तहसीलदार डॉ. सिद्धार्थ मोरे यांनी केले.

समर्थ सेवा ट्रस्ट अंतर्गत अहिल्या एकल महिला हक्क संरक्षण समितीच्या वतीने आयोजित या शिबिराचे उद्घाटन तहसीलदार डॉ. सिद्धार्थ मोरे आणि अकोले नगरपंचायतीच्या मुख्याधिकारी धनश्री पवार यांच्या हस्ते झाले. यावेळी काँग्रेसच्या गिरिजाताई पिचड, जिल्हा बालकल्याण समितीच्या सदस्य रोहिणी कोळपकर, डॉ. अर्चना नवले, समर्थ सेवा ट्रस्टच्या अध्यक्षा रूपाली रेणुकदास उपस्थित होत्या.

इंडियन कॅन्सर सोसायटीचे क्षेत्र समन्वयक किशोर साळुंखे, डॉ. सायली भेसेकर, डॉ. अश्विनी देशमुख, डॉ. सोबिया शेख, डॉ. सायली पगारे, डॉ. प्रतीक यांच्यासह सुमारे १२ डॉक्टरांच्या पथकाने तपासण्या केल्या. शिबिरात HPV-DNA, VIA, Clinical Breast Examination, Oral Clinical Examination, रक्तदाब व रक्तातील साखर यांसह विविध तपासण्या मोफत करण्यात आल्या.

शिबिरासाठी सुमारे १३० महिलांनी नोंदणी केली, त्यापैकी ७८ महिलांची तपासणी करण्यात आली. एका महिलेच्या संपूर्ण तपासणीस अंदाजे १५ हजार रुपये खर्च येतो. तपासणीचा लाभ एकल सफाई कामगार तसेच एकल घरेलू कामगार महिलांनाही मिळाला. गिरिजाताई पिचड यांच्या विशेष प्रयत्नांतून या आरोग्य शिबिरासाठी तारीख उपलब्ध झाली.

तहसीलदार डॉ. मोरे म्हणाले, अकोले तालुक्यात सुमारे साडेअकरा हजार एकल महिला आहेत. त्यांच्या प्रश्नांना प्राधान्य देऊन ते सोडविण्याकडे प्रशासनाचा कल आहे. अहिल्या एकल महिला समिती आरोग्य तपासणीसह विविध उपक्रम राबवत असून, आगामी काळात आवश्यक ती मदत करण्यात येईल.

मुख्याधिकारी धनश्री पवार म्हणाल्या, कॅन्सर स्क्रिनिंगसारखा उपक्रम एकल महिलांसाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. पतीच्या निधनानंतर अनेक जबाबदाऱ्या एकल महिलेवर येतात. मुलांचे शिक्षण आणि इतर कौटुंबिक समस्यांमुळे अनेकदा ती स्वतःच्या आरोग्याकडे दुर्लक्ष करते. एकल महिलांच्या प्रश्नांवर अकोले नगरपंचायत नेहमीच पुढाकार घेत असून, आगामी काळातही आवश्यक सहकार्य केले जाईल.

## शिक्षक कधीच निवृत्त होत नाही

### अर्जुन फडके । सेवानिवृत्तीनिमित्त प्रा. संजय कुलकर्णी यांचा सत्कार



**शेवगाव । वीरभूमी –**

शिक्षक कधीही निवृत्त होत नसतो, केवळ त्याच्या कार्याची दिशा बदलत असते. प्रा. संजय कुलकर्णी हे सेवानिवृत्तीनंतरही अध्यात्मिक सेवा आणि लोकशिक्षणाचे महत्त्वपूर्ण कार्य करत राहतील, असे प्रतिपादन गुरुदत्त सामाजिक प्रतिष्ठानचे अध्यक्ष अर्जुन फडके यांनी केले.

येथील पद्मभूषण बाळासाहेब भारदे हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. संजय कुलकर्णी यांच्या सेवानिवृत्तीनिमित्त ५ सप्टेंबर रोजी आयोजित सत्कार व निरोप समारंभात ते बोलत होते. संस्थेचे अध्यक्ष प्रा. रमेश भारदे यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम झाला.

शाळा व संस्थेच्या वतीने उपाध्यक्ष श्यामसुंदर भारदे आणि सचिव हरीश भारदे यांच्या हस्ते प्रा. कुलकर्णी यांचा सपत्नीक भेटवस्तू देऊन सत्कार करण्यात आला.

यावेळी प्रा. कुलकर्णी म्हणाले, डोनेशन किंवा वशिला यापेक्षा केवळ गुणवत्ता आणि बौद्धिक पात्रतेला महत्त्व देऊन शिक्षक भरती करणाऱ्या संस्थेत मला सेवा करता आली, हे माझे भाग्य आहे. माझी ओळख म्हणजे माझी शाळा आहे आणि तीच कायम राहील.

प्रा. सुधीर बढे, माजी शिक्षक कचरदास सारडा, अशोक पाथरकर, सौ. सुलभा कुलकर्णी व प्रा. उमेश घेवरीकर यांनी मनोगतातून प्रा. कुलकर्णी यांच्या कार्याचा गौरव केला.

एजाज काझी, वजीर पठाण, रजनीकांत छेडा, मधुकर वावरे, परवीन काझी, नसीम पठाण, अभय पालवे यांच्यासह विविध व्यक्ती, संस्था, माजी विद्यार्थी व पालक यांच्या वतीने प्रा. कुलकर्णी यांचा सत्कार करण्यात आला.

सूत्रसंचालन निलेश मोरे यांनी केले, तर पर्यवेक्षक प्रवीण बैरागी यांनी आभार मानले.

## अनिल वाळके महाराजांचा ‘राष्ट्रीय संत’ म्हणून होणार सन्मान

### कुंभमेळ्यात शंकराचार्य, संत-महंतांच्या उपस्थितीत होणार गौरव

**पाथर्डी । वीरभूमी–**



वारकरी संप्रदायाचे ज्येष्ठ उपासक अनिल वाळके महाराज यांच्या धार्मिक व सामाजिक कार्याची दखल घेत आगामी कुंभमेळा महापर्वादरम्यान त्यांचा ‘राष्ट्रीय संत’ या पदावर नियुक्तीबद्दल सन्मान करण्यात येणार असल्याची माहिती या सोहळ्याचे मार्गदर्शक नामदेव महाराज हरड यांनी दिली.

बाबूजी आव्हाड महाविद्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत या निवडीची घोषणा करण्यात आली. यावेळी नगराध्यक्ष अभय आव्हाड, मराठा महासंघाचे अध्यक्ष संभाजी राजे दहातोंडे, अशोक ताठे पाटील, रमेश घोडके आदी उपस्थित होते.

अनिल वाळके महाराज गेल्या ४० वर्षांपासून वारकरी संप्रदायाच्या माध्यमातून राज्यभर सेवा कार्य करीत आहेत. जिल्हा वारकरी संघाच्या माध्यमातून केलेल्या कार्याची दखल घेत त्यांना यापूर्वीही विविध पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे.

पुढील वर्षी नाशिक येथे होणाऱ्या कुंभमेळ्यासाठी देश–विदेशातून साधुसंत, महंत व आखाडा प्रमुख उपस्थित राहणार आहेत. शंकराचार्य, विविध संत–महंत, तपस्वी व सिद्धयोगी यांच्या उपस्थितीत कुंभमेळ्यातील मोठ्या व्यासपीठावर वाळके महाराजांचा सन्मान सोहळा होणार आहे. ज्ञानेश्वर महाराज संस्थान व तुकाराम महाराज संस्थानचे पदाधिकारीही या सोहळ्यासाठी निमंत्रित असतील, असे नामदेव महाराज हरड यांनी सांगितले.

कुंभमेळ्याच्या पर्वणीचा आध्यात्मिक लाभ भाविकांना मिळतो. या सन्मान सोहळ्यासह कुंभमेळ्यासाठी तालुक्यातील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहनही त्यांनी केले.

यावेळी अनिल वाळके महाराज म्हणाले, या नियुक्तीने संपूर्ण तालुक्याचा सन्मान झाला आहे. धर्मप्रचार व प्रसारासाठी प्रामाणिकपणे प्रयत्न करू. ‘राष्ट्रीय संत’ म्हणून मिळणारा सन्मान ही मोठी जबाबदारी आहे. कुंभमेळ्यात संत–महंतांची सेवा करण्याचे भाग्य लाभत असून या पदाला न्याय देण्याचा प्रयत्न करू.

नगराध्यक्ष अभय आव्हाड यांनी वाळके महाराजांच्या कार्याचा आढावा घेत उपस्थित मान्यवरांचा सन्मान केला. तालुक्याला राष्ट्रीय पातळीवरील सन्मान मिळवून दिल्याबद्दल त्यांनी संबंधित संघटनेचे आभार मानले.

# ‘आयुर्मेध २०२६’ तीन दिवसीय प्रात्यक्षिक प्रशिक्षण कार्यशाळेचा उत्साहात समारोप

### फार्मसी व आयुर्वेद शाखेतील विद्यार्थ्यांना एकत्रित प्रात्यक्षिक शिक्षणाची संधी

**कोपरगाव । वीरभूमी–**

राष्ट्रसंत जनार्दन स्वामी कॉलेज ऑफ फार्मसी आणि आरजेएस आयुर्वेद मेडिकल कॉलेज अँड रिसर्च सेंटर, कोकमठाण यांच्या संयुक्त विद्यमाने अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आलेल्या ‘आयुर्मेध २०२६’ या तीन दिवसीय प्रात्यक्षिक प्रशिक्षण कार्यशाळेचा उत्साहात व यशस्वीपणे समारोप झाला.

‘जेथे परंपरा आणि विज्ञान यांचा संगम होतो’ या संकल्पनेवर आधारित या कार्यशाळेत फार्मसी व आयुर्वेद शाखेतील विद्यार्थ्यांना एकत्रित प्रात्यक्षिक शिक्षणाची संधी उपलब्ध करून देण्यात आली. कार्यशाळेत विविध निवडक औषधी निर्मिती प्रक्रियांचे प्रात्यक्षिक, कच्च्या मालाची ओळख, औषधनिर्मितीतील विविध उपकरणांचे हाताळणी व कार्यपद्धती, तसेच विविध विश्लेषणात्मक तंत्रांचा प्रत्यक्ष वापर याबाबत विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देण्यात आले.

या कार्यशाळेच्या माध्यमातून फार्मसी व आयुर्वेद शाखेतील विद्यार्थ्यांमध्ये ज्ञानाची देवाणघेवाण, आंतरशाखीय संवाद व परस्पर समन्वय साधला गेला. पारंपरिक आयुर्वेदिक ज्ञान आणि आधुनिक फार्मास्युटिकल विज्ञान यांची सांगड घालत विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष प्रयोगाधारित शिक्षण देण्यात आले. त्यामुळे विद्यार्थ्यांना औषधनिर्मिती प्रक्रियेबरोबरच कच्च्या मालाची गुणवत्ता, उपकरणांचा वापर आणि विश्लेषणात्मक तंत्रज्ञान यांचे प्रत्यक्ष ज्ञान मिळाले.

कार्यशाळेचे उद्घाटन आरजेएस समूह संस्थेच्या सल्लागार परिषदेचे सदस्य श्री. विजय कडू व श्री. दीपक कोटमे, आरजेएस फाउंडेशनचे संचालक श्री. प्रणित काटकडे, राष्ट्रसंत जनार्दन स्वामी कॉलेज ऑफ फार्मसीचे प्राचार्य डॉ. नितीन जैन, आरजेएस आयुर्वेद मेडिकल कॉलेज अँड रिसर्च सेंटरचे प्राचार्य डॉ. नारायण पाटील तसेच कॉलेज ऑफ फार्मसीच्या उपप्राचार्या डॉ.उषा जैन यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले.

आरजेएस समूह संस्थेच्या वतीने विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अशा प्रकारच्या नाविन्यपूर्ण, प्रात्यक्षिक व कौशल्याधारित उपक्रमांचे सातत्याने आयोजन केले जाते. विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकी ज्ञान न देता त्यांच्यामध्ये व्यावसायिक कौशल्ये, प्रत्यक्ष औद्योगिक ज्ञान, औषधनिर्मिती प्रक्रियेची समज, संशोधनवृत्ती आणि समस्या सोडविण्याची क्षमता विकसित करण्यावर संस्थेचा विशेष भर आहे.

विद्यार्थ्यांना भविष्यातील औषधनिर्मिती उद्योग, गुणवत्ता नियंत्रण, विश्लेषणात्मक क्षेत्र व संशोधन क्षेत्रातील संधींसाठी सक्षम बनविणे, तसेच त्यांच्यामध्ये उद्योगाभिमुख दृष्टिकोन आणि संशोधनाची आवड निर्माण करणे, हा अशा उपक्रमांचा प्रमुख उद्देश आहे. बदलत्या औषधनिर्मिती क्षेत्राच्या गरजा लक्षात घेऊन विद्यार्थ्यांच्या कौशल्यविकासाला, औद्योगिक प्रशिक्षणाला आणि संशोधनाभिमुख शिक्षणाला आरजेएस समूह संस्थेकडून सातत्याने प्राधान्य दिले जाते.

‘आयुर्मेध २०२६’ या उपक्रमातून आयुर्वेद आणि आधुनिक फार्मसी विज्ञान यांचा सुंदर समन्वय साधत विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष



अनुभवाधारित शिक्षण मिळाले. भविष्यातील फार्मासिस्ट व आयुर्वेद क्षेत्रातील तज्ज्ञांना अधिक कुशल, आत्मविश्वासपूर्ण, उद्योगसक्षम आणि संशोधनाभिमुख बनविण्याच्या दृष्टीने ही कार्यशाळा अत्यंत उपयुक्त व मार्गदर्शक ठरली.

या अभिनव उपक्रमाचे संस्थेचे अध्यक्ष चांगदेव कातकडे, सचिव प्रसाद कातकडे, प्राचार्यांनी व उपस्थित मान्यवरांनी कौतुक केले. कार्यशाळेच्या यशस्वी आयोजनासाठी डॉ. सुनील घोंगडे, डॉ.अदिती शिंदे, डॉ. योगिनी भोयर, डॉ. वैभव बिलारी, डॉ. पूनम काळे, डॉ. प्राजक्ता आव्हाड व डॉ. वर्षा रोकडे प्रा. कांचन गुर्सळ, प्रा. मेघना रायजादे, प्रा. अक्षदा वाघचौरे, प्रा.. वैभव गाढवे, प्रा. सोनाली कोते, प्रा. पूजा जाधव, प्रा. विशाखा रणशूर, प्रा. साक्षी काले, यांनी विशेष परिश्रम घेतले. तसेच दोन्ही महाविद्यालयांच्या विद्यार्थी परिषद सदस्यांनी कार्यशाळेच्या आयोजनात सक्रिय सहभाग नोंदविला.

# प्राथमिक शिक्षणाचा पाया भक्कम करून गुणवत्तापूर्ण शिक्षण द्यावे

## पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील । जिल्ह्यातील पुरस्कारप्राप्त १४ शिक्षक आणि २ केंद्रप्रमुखांचा गौरव

**● शिर्डी । वीरभूमी–**

**प्राथमिक शिक्षण हा विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक जीवनाचा पाया असून हा पाया भक्कम झाला तर देशासाठी आदर्श नागरिक घडविणे शक्य होईल. शिक्षकांनी बदलत्या काळाचे वास्तव लक्षात घेऊन तळागाळातील विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्यासाठी नवीन तंत्रज्ञासह शिक्षण देण्याचे सातत्याने प्रयत्न करावेत, असे आवाहन जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ.राधाकृष्ण विखे पाटील यांनी केले.**



शिक्षक दिनानिमित्त जिल्हा परिषद शिक्षण विभागाच्या वतीने आयोजित शिक्षक पुरस्कार वितरण सोहळा प्रवरानगर येथील डॉ धनंजय गाडगीळ सभागृहात आयोजित करण्यात आला होता.जिल्ह्यातील उल्लेखनीय कार्य करणाऱ्या १४ शिक्षक आणि २ केंद्रप्रमुखांचा गौरव करण्यात आला. याप्रसंगी ते बोलत होते.

यावेळी माजी मंत्री अण्णासाहेब मस्के, माजी जिल्हा परिषद अध्यक्षा शालिनीताई विखे पाटील, माजी जिल्हा परिषद सदस्य राजेश परजणे, शिक्षक मतदार संघाचे आमदार किशोर दराडे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी, जिल्हा शिक्षणाधिकारी भास्कर पाटील, शिक्षणाधिकारी बाळासाहेब बुघे, शिक्षणाधिकारी संध्या गायकवाड, गटशिक्षणाधिकारी विवेक गुंड यांच्यासह शिक्षण विभागातील अधिकारी, कर्मचारी, शिक्षक व मान्यवर उपस्थित होते.

पालकमंत्री विखे पाटील म्हणाले, शिक्षकांनी केवळ पुस्तकी ज्ञानापुरते मर्यादित न राहता वास्तवाचा आधार घेत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी काम करणे आवश्यक आहे. विशेषतः ग्रामीण व तळागाळातील विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी प्रोत्साहन देणे गरजेचे आहे.खासगी शाळांमधील विद्यार्थी सरकारी शाळांकडे वळू लागले आहेत. ही बाब सरकारी शाळांमधील शिक्षणाच्या गुणवत्तेवर असलेला विश्वास अधोरेखित करणारी आहे.

बदलत्या काळानुसार ऑनलाइन शिक्षणाची सुविधा उपलब्ध झाली आहे. मात्र, त्याचे काही दुष्परिणामही आता दिसून येत आहेत. अनेक विद्यार्थी मोबाईल आणि सोशल मीडियाच्या अतिवापराच्या आहारी जात असल्याचे निदर्शनास येत आहे. विद्यार्थ्यांचा सोशल मीडिया व मोबाईलचा वापर मर्यादित करण्यासाठी पालक, शिक्षक आणि शालेय प्रशासनाने एकत्रितपणे प्रयत्न करणे आवश्यक आहे. शिक्षकांनीही शालेय वेळेत मोबाईलचा अनावश्यक वापर टाळावा. शिक्षकांचे आचरण विद्यार्थी अनुकरण करीत असल्याने शिक्षकांनी स्वतः मोबाईलचा वापर कमी केल्यास विद्यार्थ्यांमध्येही त्याचा सकारात्मक परिणाम दिसून येईल, असे त्यांनी सांगितले.

शिष्यवृत्ती परीक्षेत अहिल्यानगर जिल्ह्याने राज्यात तिसरा क्रमांक मिळविला आहे, ही जिल्ह्यासाठी अभिमानाची बाब असल्याचे पालकमंत्र्यांनी सांगितले. प्राथमिक शिक्षणाचा पाया मजबूत करण्यासाठी शिक्षकांनी अधिक प्रभावीपणे काम करावे. प्राथमिक स्तरावरच विद्यार्थ्यांच्या ज्ञानाचा, कौशल्यांचा आणि व्यक्तिमत्त्वाचा विकास झाल्यास भविष्यात सक्षम व आदर्श नागरिक घडण्यास मदत होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

शाळांमध्ये आयोजित करण्यात येणाऱ्या गणित व विज्ञान प्रदर्शनांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये संशोधनाची आवड निर्माण होते. अशा प्रदर्शनांमध्ये सहभागी होऊन पुढील संशोधनासाठी बाहेर जाणाऱ्या विद्यार्थ्यांना शालेय प्रशासनाने आवश्यक ते सहकार्य व प्रोत्साहन द्यावे. विद्यार्थ्यांमधील वैज्ञानिक दृष्टिकोन, कल्पकता आणि संशोधनवृत्तीला चालना देण्यासाठी शिक्षकांनी विशेष प्रयत्न करावेत, असेही पालकमंत्री म्हणाले.

शाळांमधील मूलभूत सुविधांना प्राधान्य देणे आवश्यक असून प्रत्येक शाळेत १०० टक्के शौचालय सुविधा, डिजिटल बोर्ड, सुसज्ज वर्गखोल्या तसेच विद्यार्थ्यांना आवश्यक त्या सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न करावेत. विद्यार्थ्यांना सुरक्षित, स्वच्छ आणि आधुनिक शैक्षणिक वातावरण उपलब्ध करून देणे ही सर्वांची सामूहिक जबाबदारी असल्याचे त्यांनी सांगितले.

टाकळी ढोकेश्वर येथील नवोदय विद्यालयात निवड झालेले ५२ विद्यार्थी प्राथमिक शाळांमधून शिक्षण घेऊन आले आहेत, हे अभिमानास्पद आहे. प्राथमिक शाळांमध्ये विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या शिक्षणाची गुणवत्ता अधोरेखित होत असल्याचे पालकमंत्री विखे पाटील यांनी नमूद केले.

शिक्षक पुरस्कार वितरण कार्यक्रम सोहळ्याचे प्रस्ताविकात जिल्हा परिषदचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांनी शिक्षण विभागाअंतर्गत राबवित असलेल्या जिल्ह्यातील विविध उपक्रमांची माहिती दिली.

पुरस्कारप्राप्त शिक्षकांनी केलेल्या उल्लेखनीय कार्यातून इतर शिक्षकांनी प्रेरणा घेऊन विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेसोबतच त्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी योगदान द्यावे. शिक्षण क्षेत्रातील सकारात्मक बदलांसाठी शिक्षकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असून शिक्षकांनी ही जबाबदारी प्रभावीपणे पार पाडावी, असे आवाहन पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी केले.

### पुरस्कारप्राप्त शिक्षक व केंद्रप्रमुख

■ जिल्हा शिक्षक पुरस्कार प्राप्त शिक्षकांमध्ये सुमन खतोडे (उपाध्यापिका, जि. प. नवलेवाडी, अकोले), दिपाली रेपाळ (उपाध्यापिका, जि. प. जाखुरी, संगमनेर), सुनील पोरे (उपाध्यापक, जि. प. घोयेगाव, कोपरगाव), संदीप कोरडे (उपाध्यापक, जि. प. गोरडे वस्ती, राहाता), स्वाती पटारे (उपाध्यापिका, जि. प. अशोक नगर, श्रीरामपूर), सुवर्ण कचरे (उपाध्यापिका, जि. प. कुक्कडवेढे, राहुरी), राहुल आठरे (पदवीधर, जि. प. भालगाव, नेवासा), सुरेखा खाडे (उपाध्यापक, जि. प. राजनी, पाथर्डी), अमोल पवार (उपाध्यापक पदवीधर, जि. प. बावी, जामखेड), अमोल हुमे (उपाध्यापक, जि. प. अंबिका नगर, कर्जत), शहाजी खराडे (उपाध्यापक, जि. प. भानगाव, श्रीगोंदा), प्रवीण कुमार झावरे (उपाध्यापक, जि. प. टाकळी ढोकेश्वर, पारनेर), मनोज काशीद (उपाध्यापक, जि. प. खोसपुरी, अहिल्यानगर), किशोर मिसाळ (उपाध्यापक, जि. प. झिरपे वस्ती, शेवगाव) तसेच केंद्रप्रमुख बाळासाहेब जाधव (धांदरफळ, संगमनेर) आणि केंद्रप्रमुख रामराव निकम (पाटोदा, जामखेड) यांचा समावेश आहे.

# आदर्श पिढीसाठी शिक्षक-विद्यार्थ्यांत विश्वास आवश्यक

## प्राचार्य विद्याचंद्र सातपुते । आनंदगड पॉलिटेक्निकमध्ये शिक्षक दिन उत्साहात

**● अकोले । वीरभूमी–**

आदर्श पिढी घडविण्यासाठी शिक्षक आणि विद्यार्थ्यांमध्ये परस्पर विश्वास असणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन आनंदगड पॉलिटेक्निक कॉलेजचे समन्वयक तथा आयटीआयचे माजी प्राचार्य विद्याचंद्र सातपुते यांनी केले.



आंतरभारती रुरल इंटरनॅशनल मेडिकल एज्युकेशन ट्रस्ट संचलित आनंदगड पॉलिटेक्निक कॉलेज, वीरगाव येथे विद्यार्थ्यांच्या वतीने आयोजित शिक्षक दिन कार्यक्रमात ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कॉलेजचे प्राचार्य प्रा. विनोद गिरी होते. यावेळी सर्व प्राध्यापक उपस्थित होते.

सातपुते म्हणाले, शिक्षक-विद्यार्थी नाते विश्वासाचे असणे गरजेचे आहे. शिक्षकी पेशाला समाजात मानाचे स्थान असून विद्यार्थ्यांना घडविणे हे शिक्षकांचे प्रमुख ध्येय असावे. शिक्षकाची एक चूक संपूर्ण भावी पिढीवर परिणाम करू शकते. संस्थेचे अध्यक्ष रावसाहेब वाकचौरे व सचिव डॉ. अनिल रहाणे यांनी संस्थेला गुणवंत प्राध्यापकांची साथ दिली आहे. प्राध्यापक शैक्षणिक क्षेत्रात काम करण्याबरोबरच आपली शैक्षणिक पात्रता वाढविण्यासाठी प्रयत्न करीत आहेत, ही कौतुकास्पद बाब आहे.

शिक्षक दिनानिमित्त विद्यार्थ्यांनी शिक्षकांच्या सन्मानासाठी केलेले नियोजन उत्कृष्ट होते. विद्यार्थी चांगले घडून आपल्या करिअरमध्ये यशस्वी होतात, तोच शिक्षकांचा खरा सन्मान असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी सातपुते यांनी आपण शिक्षक कसे झालो, याबाबतचे अनुभव सांगून सर्व शिक्षकांना शिक्षक दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांनी दिवसभर शिक्षकांची भूमिका पार पाडत विविध वर्गांचे अध्यापन केले तसेच महाविद्यालयाचे कामकाजही पाहिले. सर्व शिक्षकांचा पेन व गुलाबपुष्प देऊन सन्मान करण्यात आला.

सन २०२५-२६ चा 'फॅकल्टी ऑफ द इयर' पुरस्कार सिव्हिल इंजिनीअरिंग विभागाचे प्राध्यापक आकाश डोखे यांना प्रदान करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यार्थिनी दिशा बगाड व शर्वरी शेळके यांनी केले, तर आर्यन काचले यांनी आभार मानले.

# संजीवनी युवा प्रतिष्ठानचा सामाजिक बांधिलकीचा आदर्श निर्णय; दहीहंडीचा जल्लोष टाळून आपत्तीग्रस्तांना मदतीचा हात

## भव्य आयोजनाचा खर्च पंतप्रधान राष्ट्रीय मदत निधीत जमा करणार

**● कोपरगाव । वीरभूमी–**

कोपरगाव शहरातील श्री छत्रपती शिवाजी महाराजांची मानाची दहीहंडी यंदा साध्या व प्रातिनिधिक स्वरूपात साजरी करण्यात येणार असून, भव्य आयोजनाचा खर्च टाळून वाचणारी रक्कम पंतप्रधान राष्ट्रीय मदत निधीत जमा करण्याचा निर्णय संजीवनी युवा प्रतिष्ठानने घेतला आहे. देशातील विविध भागांत नैसर्गिक आपत्तीमुळे नागरिक संकटात सापडले असताना उत्सवाच्या खर्चाऐवजी आपत्तीग्रस्तांच्या मदतीला हातभार लावण्याचा हा निर्णय घेतला असल्याची माहिती संजीवनी युवा प्रतिष्ठानच्या वतीने पत्रकार परिषदेत देण्यात आली.

संजीवनी युवा प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष आ. विवेकभैय्या कोल्हे यांच्या मार्गदर्शनाखाली हा सामाजिक बांधिलकीचा निर्णय घेण्यात आला आहे. ५ सप्टेंबर रोजी सायंकाळी ६.३० वाजता छत्रपती शिवाजी महाराज स्मारकासमोर राष्ट्रसंत जगद्गुरु जनार्दन स्वामी आश्रमाचे मठाधिपती परमपूज्य रमेशगिरीजी महाराज यांच्या हस्ते मानाची दहीहंडी फोडण्यात येणार आहे. नागरिकांनी या कार्यक्रमास उपस्थित राहावे, असे आवाहन संजीवनी युवा प्रतिष्ठानच्या युवा सेवकांनी केले आहे.

देशातील विविध भागांत निर्माण झालेल्या नैसर्गिक आपत्तींच्या पार्श्वभूमीवर यंदाच्या दहीहंडी उत्सवाला सामाजिक मदतीची जोड देण्यात आली आहे. २६ ऑगस्ट २०२६ रोजी नेपाळमध्ये निर्माण झालेल्या नैसर्गिक आपत्तीमुळे मोठ्या प्रमाणावर जीवित व वित्तहानी झाली असून, संकटग्रस्त नागरिकांना मदत मिळावी यासाठी दहीहंडीच्या भव्य आयोजनावरील खर्चातून मदत करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.'उत्सवापेक्षा माणुसकी मोठी' या भावनेतून हा निर्णय घेण्यात आला आहे. उत्सव साजरा करताना समाजाप्रती असलेले दायित्वही जपले पाहिजे, या विचारातून दहीहंडीचा कार्यक्रम साध्या स्वरूपात घेण्यात येणार आहे. उत्सवाच्या माध्यमातून आनंद साजरा करण्याबरोबरच संकटात सापडलेल्या नागरिकांच्या मदतीसाठी पुढे येण्याचा संदेश या उपक्रमातून देण्यात आला आहे.संजीवनी युवा प्रतिष्ठानने यापूर्वीही नैसर्गिक आपत्ती आणि संकटाच्या काळात समाजहिताला प्राधान्य दिले आहे. २०१९ मध्ये कोल्हापूर-सांगली येथे आलेल्या महापुराच्या वेळी दहीहंडीचा कार्यक्रम रद्द करून बक्षिसाची रक्कम मुख्यमंत्री सहायता निधीत जमा करण्यात आली होती. त्यामुळे यंदाचा निर्णय हा प्रतिष्ठानच्या सामाजिक बांधिलकीची परंपरा पुढे नेणारा ठरला आहे.

२०२१ मध्ये कोरोनाच्या संकटाच्या काळात प्रातिनिधिक स्वरूपात दहीहंडी साजरी करण्यात आली होती. याच काळात संजीवनी युवा प्रतिष्ठानच्या माध्यमातून ५०० बेडचे डेडिकेटेड कोविड सेंटर उभारण्यात आले होते. या केंद्रातून हजारो रुग्णांना सेवा देण्यात आली. तसेच २०२३ मध्ये दुष्काळी परिस्थिती निर्माण झाल्यानंतर मोठ्या स्वरूपातील दहीहंडी रद्द करून पर्जन्य यागाचे आयोजन करण्यात आले होते.यंदाही उत्सवाचा अनावश्यक खर्च टाळून तो आपत्तीग्रस्तांच्या मदतीसाठी उपयोगात आणण्याचा निर्णय घेत संजीवनी युवा प्रतिष्ठानने सामाजिक बांधिलकीची आपली परंपरा कायम ठेवली आहे अशी भूमिका संजीवनी युवा प्रतिष्ठान कडून मांडण्यात आली आहे.

# विद्यार्थ्यांच्या मनात प्रेरणा निर्माण करणे हेच शिक्षकाचे खरे यश

## प्रा. सुनील आढाव । आबासाहेब काकडे कनिष्ठ महाविद्यालयात शिक्षक दिन साजरा

**● शेवगाव । वीरभूमी–**

विद्यार्थ्यांच्या आयुष्यात किती माहिती भरली यापेक्षा त्यांच्या मनात किती प्रेरणा निर्माण केली, हे शिक्षकाचे खरे यश आहे. प्रत्येक विद्यार्थ्यामध्ये क्षमता असते. ती ओळखून त्याच्यावर विश्वास ठेवणे आणि योग्य दिशा देणे ही शिक्षकांची जबाबदारी आहे, असे प्रतिपादन प्रा. सुनील आढाव यांनी केले.

कर्मयोगी आबासाहेब काकडे शैक्षणिक समूहाच्या आबासाहेब काकडे कनिष्ठ महाविद्यालयात भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जयंतीनिमित्त आयोजित शिक्षक दिन कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते.

यावेळी प्राचार्य डॉ. लक्ष्मण बिटाळ, उपप्राचार्य अशोक तमनर, पर्यवेक्षक रवींद्र आगळे, माजी उपप्राचार्या रूपा खेडकर, चापडगाव विद्यालयाचे माजी प्राचार्य गणपत शेलार, माजी प्राध्यापक सखाराम घावटे यांच्यासह महाविद्यालयातील प्राध्यापक उपस्थित होते.

प्रा. आढाव म्हणाले, विद्यार्थ्यांनी केवळ गुणांवर अवलंबून न राहता स्वतःच्या क्षमतेवर विश्वास ठेवावा. मोबाईल तुमच्या हातात ठेवा; तुमचे आयुष्य मोबाईलच्या हातात देऊ नका, असा सल्ला देत त्यांनी सोशल मीडियाचा अनावश्यक वापर टाळण्याचे आवाहन केले. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या (एआय) युगात तंत्रज्ञानाचा योग्य वापर करताना विचारशक्ती, कल्पकता, निर्णयक्षमता आणि माणुसकी जपणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांनी मोठी स्वप्ने पाहून त्यासाठी सातत्याने प्रयत्न करावेत, अपयशाला घाबरू नये आणि यशाबरोबरच चांगला माणूस होण्याचा प्रयत्न करावा. विद्यार्थ्यांचे यश हीच शिक्षकांची खरी कमाई आहे, असेही त्यांनी सांगितले.

या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी शिक्षकांची भूमिका स्वीकारून विविध वर्गांमध्ये अध्यापनाचा प्रत्यक्ष अनुभव घेतला. तसेच उपस्थित गुरुजनांचे गुरुपूजन केले. कु. वैष्णवी बडधे, आदित्य माळी, तेजस खैरे, श्रुती घुगे, परिणीती कवडे व तनिष्का आंधळे यांनी विद्यार्थी शिक्षक म्हणून अध्यापन केले व आपले अनुभव व्यक्त केले. विद्यार्थी प्राचार्य म्हणून जबाबदारी सांभाळलेल्या कु. पूजा लोंढे हिनेही अनुभव कथन केला.




प्राचार्य डॉ. बिटाळ म्हणाले, शिक्षक दिन हा केवळ शिक्षकांचा सन्मान करण्याचा दिवस नसून शिक्षक-विद्यार्थी नात्यातील विश्वास व कृतज्ञता दृढ करण्याचा दिवस आहे. शिक्षकांच्या मार्गदर्शनाचा योग्य अंगीकार करून विद्यार्थ्यांनी ध्येयाकडे वाटचाल करावी.

रूपा खेडकर यांनी आई-वडील व गुरुजनांचा आदर करण्याचे आवाहन केले. गणपत शेलार यांनी शिक्षक विद्यार्थ्यांना यशाचा मार्ग दाखवतात, असे सांगितले. सखाराम घावटे यांनी डॉ. राधाकृष्णन यांच्या विचारांची माहिती दिली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक कु. ज्ञानेश्वरी ढाकणे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. जरीना शेख व कु. प्रज्ञा दळे यांनी केले, तर प्रा. अनिल जगताप यांनी आभार मानले.